बेरोजगारांच्या सेवा सोसायटयांना तसेच लोकसेवा केंद्रांना रु.५ लाखापर्यन्तची कामे विना निविदा देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
रोजगार व स्वयंरोजगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक इएसई-२००३/प्र.क्र.१९१/रोस्वरो-१,
नवीन प्रशासन भवन, १४ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १ फेब्रुवारी, २००६

वाचा : १) शासन निर्णय,रोस्वरो वि.क्र.रोस्वरो-२००२/प्र.क्र.२६७/रोस्वरो-१,दि.१७ ऑगस्ट २००२
२) शासन परिपत्रक म.व.व.वि.संकीर्ण-२००२/प्र.क्र.२८५/का-२,दि.३० ऑगस्ट २००२
३) शासन परिपत्रक न.वि.वि.क्र.बरोरो-१०/२००२/प्र.क्र.११०/नवि-२७,दि.२३/१०/२००२
४) शा.नि.ग्रा.वि.व.ज.वि.क्र.झेडपीए-२००२/प्र.क्र.२०८/३३/(विच-९)दि.३० डिसेंबर २००२
५) शा.नि.गृह वि.एसटीसी-३४०२/प्र.क्र.१७५/परि-१,दि.२९ मे २००३
६) शा.नि.कृषि व पदुम वि.क्र.संकीर्ण/१०२००२/२२५९/(५४)पदुम-४,दि.१७ मे २००३
७) शा.नि.उ.ऊ.व का.वि.क्र.संकीर्ण-२००३/प्र.क्र.३०६/प्रशा-४,दि.२९ मे २००३
८) शा.नि.कृषि व पदुम वि.क्र.संकीर्ण-२००२/२३२६७/प्र.क्र.२११/पदुम-१७,दि.२९/५/२००३
९) शा.नि.सा.बां.वि.क्र.संकीर्ण-०९/०२/प्र.क्र.४९१/इमारती-२, दि.२१ जून २००३
१०) शा.नि.कृषि व पदुम वि.क्र.रोस्वरो-१००१/प्र.क्र.१२३/पदुम-८,दि.११ ऑगस्ट २००३
११) शा.नि.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये वि.क्र.संकीर्ण-२००३/सीआर-१३५/०३/समन्वय दिनांक ४ डिसेंबर २००३.
१२) शा.नि.आ.वि.वि.रोस्वरो-१२०२/प्र.क्र.६४/(२००२)/का.१२,दि.१२ फेब्रुवारी २००४
१३) शा.परिपत्रक शा.शि.वि. क्र.एमआयएस १००२/(१६५/०२)/समन्वय कक्ष दि.२३.०६.२००४
१४) शा.परिपत्रक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय क्र.प्रविस्था-४०(२००४)/रोजगार/का-१/१५४९ दि.१९.०७.२००४
१५) शा.नि.उ.ऊ.व का.क्र.भांखस-२००४/(३०३७)/उद्योग-६ दि.११.८.२००४
१६) शा.नि.वित्त वि.संकिर्ण-११०४/प्र.क्र.९३/२००४/कोषा-प्र-३,दि.२८ डिसेंबर २००४
१७) शा.नि.गृह वि.एचडीओ-३६०४/प्र.क्र.७४/आस्था-१,दि.३१ मार्च २००५

प्रस्तावना :-

शासनाने बेरोजगारीचा ज्वलंत प्रश्न काही अंशी सोडविण्यासाठी ऑक्टोबर २००० मध्ये रोजगार व स्वयंरोजगार धोरण अंमलात आणण्याचा निर्णय घेतला. या धोरणांतर्गत स्वयंरोजगारास वाव असलेल्या क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायटया/लोकसेवा केन्द्रे यांचे मार्फत ग्रामीण तसेच शहरी जनतेला दैनंदिन गरजेच्या सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आल्या आहेत. या सहकारी सेवा सोसायटयांना/लोकसेवा केन्द्राना आर्थिकदृष्टया बळकट करण्यासाठी त्या करीत असलेल्या कामाशिवाय शासकीय कामे मिळावीत, या उद्देशाने उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यास अनुलक्षून शासनाच्या विविध प्रशासनिक विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालिल यंत्रणेकडील कामे सहकारी सेवा सोसायटांना/लोकसेवा केन्द्राना उपलब्ध करुन देण्याबाबत वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रके,सूचना इत्यादी, निर्गमित केल्या आहेत.

२. बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायटयांना /लोकसेवा केन्द्र यांना सध्या मिळत असलेली कामे त्या कामाची वित्तिय मर्यादा अत्यंत कमी असून त्यांनी रु.५ लाखापर्यंत विना निविदा कामे मिळावे तसेच जिल्हास्तरीय कामे त्या जिल्हयातील सहकारी सेवा सोसायटयांना/लोकसेवा केन्द्रांना देण्याबाबत व त्यासाठी एक समिती गठित करावी अशी मागणी सहकारी सेवा सोसायटया /लोकसेवा केन्द्र तसेच लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून पुढे आली असून, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

राज्यातील बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायटयांना /लोकसेवा केन्द्र यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने यापूर्वी विविध सवलती दिल्या आहेत, तथापि बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायटयांना /लोकसेवा केन्द्र यांना स्वावलंबी होण्यासाठी अधिक रक्कमेची कामे देण्याची आवश्यकता विचारात घेऊन आता या सहकारी सेवा सोसायटयांना /लोकसेवा केन्द्रांना रु. ५ लाख इतक्या रक्कमेची कामे विना निविदा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. सदर कामांचे वाटप पारदर्शक व न्यायनिष्ठरित्या करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक जिल्हयात खालीलप्रमाणे एक समिती नियुक्त करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १) मुख्य-कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ३) कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था | सदस्य |
| ५) सेवा सोसायटयांचे फेडरेशन/सेवा सोसायटीचा प्रतिनिधी | सदस्य |
| ६) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी | सदस्य सचिव |

३. मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयासाठी समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| १) अतिरिक्त जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ३) कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था | सदस्य |
| ५) सेवा सोसायटयांचे फेडरेशन/सेवा सोसायटीचा प्रतिनिधी | सदस्य |
| ६) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी | सदस्य सचिव |

## कामाची आखणी

४. सहकारी सेवा सोसायटी/लोकसेवा केन्द्र यांना कामांचे वाटप करण्यासाठी समितीने कामांच्या वाटपाची योजनाबध्द आखणी करावी व त्यासाठी योग्य पध्दती निश्चित करावी. कामांचे वाटप करतांना कोणत्याही सहकारी सेवा सोसायटी/लोकसेवा केंद्र यांच्यावर अन्याय होणार नाही व सर्व सहकारी सेवा सोसायटयांना/लोकसेवा केन्द्रांना समान संधी मिळेल याची दक्षता घेण्यात यावी.

५. परिच्छेद २,३, व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्थापित समितीने कामाचे वाटप खालील अटी शर्तींच्या अधिन राहून करावे :-

## अटी व शर्ती:-

१) बेरोजगारांनी स्थापन केलेली सहकारी सेवा सोसायटी/लोकसेवा केन्द्र यांची स्थापना ही ऑगस्ट २००० नंतर केलेली असावी. तसेच सहकार कायदा १९६० अन्वये नोंदणीकृत असावी.

२) बेरोजगारांची सहकारी सेवा सोसायटी/लोकसेवा केन्द्रे त्यांना देण्यात येणारे काम करण्यासाठी पात्र असावे.

३) समिती मार्फत कामे मिळण्यासाठी सहकारी सेवा सोसायटी/लोकसेवा केन्द्र किमान ६ महिने कार्यरत असावे. सहकारी सेवा सोसायटीस/लोकसेवा केन्द्रास रु.५ लाखापर्यंतची कामे मिळण्यासाठी त्यांनी यापूर्वी कामे केलेली असणे आवश्यक आहे.

४) रु.५ लाखापेक्षा मोठ्या रक्कमेची कामे बेरोजगार अभियंत्याना देण्यात येतात. त्यामुळे बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना रु.५ लाखापर्यंतची कामे देण्यासाठी त्यापेक्षा मोठ्या रक्कमेची कामे तुकडे (Break up) करुन ती सहकारी सेवा संस्थांना देवू नयेत जेणेकरुन बेरोजगार अभियंत्याना मिळणा-या कामावर त्याचा परिणाम होणार नाही.

५) सर्व सोसायटयांना समप्रमाणात कामे मिळावीत यासाठी ज्या सेवा सोसायट्यांना एका आर्थिक वर्षात ३ पेक्षा अधिक कामे मिळाली आहेत त्यांना पुढील काम देताना प्राधान्यक्रम खाली ठेवून, ज्यांना अजिबात कामे मिळाली नाहीत, अथवा कमी कामे मिळाली किंवा अल्प किंमतीची कामे मिळाली, अशा सोसायट्यांना प्राधान्य देण्यात यावे.

६) सोसायटीस देण्यात येणा-या कामावर देखरेख तसेच तांत्रिक सल्ला देण्यासाठी अभियंत्याची आवश्यकता आहे असे काम वाटप समितीचे मत असल्यास, व सोसायटीत अभियंता सदस्य नाही अशा कामासाठी सोसायटीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत बेरोजगार अभियंत्याची अथवा इतर नोंदणीकृत संस्थेतील अभियंत्याची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक करावी. तथापि, त्यांचे मानधन मिळालेल्या कामाच्या रक्कमेच्या ठराविक प्रमाणात असावे. याबाबत काम वाटप समितीने योग्य तो निर्णय घ्यावा.

७) सहकारी सेवा सोसायटीचे/लोकसेवा केन्द्राचे खाते सहकारी बँक/राष्ट्रीयकृत बँकेत उघडले असावे.

८) सहकारी सेवा सोसायटीच्या/लोकसेवा केन्द्राचे आर्थिक उलाढालीचे नियमित वार्षिक लेखा परिक्षण केलेले असावे.

९) सहकारी सेवा सोसायटी/लोकसेवा केन्द्र यांनी सदस्यांना ओळखपत्रे देणे आवश्यक असून, ते क्रियाशील सदस्य असणे आवश्यक आहे. जे सदस्य क्रियाशील नसतील त्यांची नांवे सदर सहकारी सेवा सोसायटीतून/लोकसेवा केन्द्रातून कमी करुन त्या ठिकाणी नवीन सदस्य घेण्यात यावेत.

६. जिल्ह्यातील कामे देणा-या संबंधित विभागांनी/खात्यांनी संदर्भ क्रमांक १ मध्ये दिलेल्या शासन निर्णयास अनुलक्षून वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके/सूचनांच्या अधिन राहून बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना/लोकसेवा केन्द्रांना द्यावयाच्या सर्व कामांची यादी संबंधित जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व फेडरेशन (बेरोजगारांच्या सेवा सोसायटयांचे जिल्हा फेडरेशन) यांचेकडे पाठवावी. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, यांनी जिल्ह्यातील बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांच्या केलेल्या तपासणी संबंधीचा अहवाल काम वाटप समितीच्या अध्यक्षांकडे सादर करावा व त्या अनुषंगाने उपलब्ध कामे विचारात घेऊन तसेच संबंधित संस्थांची क्षमता लक्षात घेऊन त्यांना समप्रमाणात कामाचे वाटप करण्यात यावे. काही ठराविक सहकारी सेवा सोसायटयांनाच /लोकसेवा केन्द्रांना कामाचे वाटप केले जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

७. काम वाटप समितीने वाटून दिलेल्या कामांची योग्यरितीने परिपूर्तता करुन घेण्याची सर्व जबाबदारी काम देणा-या संबंधित विभागाचीच राहील. कामे चालू असतांना संबंधित विभागाच्या अधिका-यांनी त्या-त्या

विभागाच्या विहित सूचनानुसार तपासणी करावी व तत्संबंधीचे अहवाल/अभिप्राय संबंधित विभागांस सादर करावे.

८. ज्या विभागांच्या शासन निर्णयामध्ये अथवा सध्या उपलब्ध असलेल्या नियमांमुळे बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायटयांना /लोकसेवा केन्द्रास सादर शासन निर्णयात नमूद केलेल्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कमेची कामे देण्याची तरतूद आहे अथवा ती यंत्रणा सक्षम अथवा तत्पर असल्यास त्यास या शासन निर्णयामुळे बाधा येणार नाही. मात्र कमी रक्कमेची तरतूद असल्यास, सुधारित तरतूद या शासन निर्णयाप्रमाणे राहील. संबंधित प्रशासनिक विभागांनी त्याप्रमाणे त्यांचे शासन निर्णय/नियमात बदल करावेत.

९. हे आदेश सर्व मंत्रालयीन प्रशासनिक विभाग व त्यांचे अधिपत्याखालील कार्यालये, शासकीय/निमशासकीय संस्था/महामंडळे यांना तात्काळ लागू करण्यात येत आहेत. व त्यानूसार संबंधित त्या प्रशासनिक विभागाने कार्यवाही करुन त्या संबंधीचा आढावा देखील घेण्यात यावा असेही निदेश देण्यात येत आहेत.

१०. हे आदेश ग्राम विकास व जलसंधारण विभाग, नगर विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महिला व बाल विकास विभागाच्या तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४९०/०५/व्यय-६, दि. २.११.२००५ अन्वये व इतर सर्व संबंधित विभागांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(गोविंद स्वरुप)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
४. मा. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव, यांचे सह सचिव.
६. सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांचे अधिपत्याखालील कार्यालये (मंत्रालयीन विभागामार्फत)
७. आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, कोकण भवन, ३ रा मजला, नवी मुंबई.
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (मंत्रालयीन विभागामार्फत)
११. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था (मंत्रालयीन विभागामार्फत)
१२. सर्व मुख्य अभियंते/अधिक्षक अभियंते/कार्यकारी अभियंते सार्वजनिक बांधकाम विभाग/जलसंपदा विभाग(मंत्रालयीन विभागामार्फत)
१३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
१४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा), मुंबई.
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखापरिक्षा), नागपूर.
१७. सर्व उपसंचालक, विभागीय मुख्यालये, रोजगार व स्वयंरोजगार.
१८. सर्व उपनिबंधक सहकारी संस्था (मंत्रालयीन विभागामार्फत)
१९. सर्व तालुका उपनिबंधक/सहायक निबंधक, सहकारी संस्था (मंत्रालयीन विभागामार्फत)
२०. सर्व सहाय्यक संचालक/जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी
२१. सर्व कार्यासने, रोस्यरो विभाग/निवड नस्ती (रोस्वरो-१)

मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव,
वित्त विभाग (अर्थसंकल्प-२०/अर्थसंकल्प-३/ व्यय-५),
नियोजन विभाग (कार्यासन १४४३),
सर्व मंत्रालयीन विभाग,
आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
निवड नस्ती (रोस्वरो-१),
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा), मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा), नागपूर.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व उपसंचालक, रोजगार व स्वयंरोजगार, विभागीय मुख्यालये,
सर्व सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी,
रोजगार व स्वयंरोजगार विभागातील सर्व कार्यासन अधिकारी,

-------

H-827-2.